सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कालमर्यादीत

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/ 2223

दिनांक :- 06 SEP 2024

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :- :-** १.मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र. :- २/एनजीसी/Intake App/२०२४/४४० दिनांक ३/७/२०२४.
२.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/१६३५ दि. ५ जुलै २०२४.
३.विकाअ/शिक्षण/२०२४/२१२० दिनांक २८ ऑगष्ट २०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली, फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्यामार्फत आपणास औषधनिर्माणशास्त्र पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास शिखर परिषदांव्दारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता मान्यता प्राप्त झालेली असेलच.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रथम वर्ष पोस्ट एच. एस. सी. औषधनिर्माणशास्त्र पदविका आणि प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरीता प्रवेश प्रक्रिया तंत्रशिक्षण संचालनालयाध्दारे ऑनलाईन पध्दतीने पार पाडण्याचे दृष्टीने या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक २ व ३ अन्वये आपल्या संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांनी या कार्यालयात **दिनांक ३/९/२०२४** पर्यंत प्रत्यक्ष उपस्थित राहुन सदर अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचुक व अद्ययावत करण्याबाबत कळविलेले होते. तथापी सदर अभ्यासक्रम चालविणा-या ब-याचश्या संस्थांनी नमुद दिनांकापर्यंत प्रवेशक्षमतेची माहीती अचुक व अद्ययावत केलेली नाही.

तेव्हा सदर अभ्यासक्रम चालविणा-या संस्थांना पुनश्चः कळविण्यात येते की, आपल्या संस्थेचे फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे मान्यता पत्र, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे सलग्नता प्रमाणपत्र

(औषधनिर्माणशास्त्र पदवीका अभ्यासक्रमाकरीता) तसेच शासन निर्णय, मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे अंतिम मान्यतेचे पत्र व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे सलग्नता प्रमाणपत्र तसेच पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यापिठामार्फत प्रदान केलेले सलग्नता प्रमाणपत्रासह जाणकार अधिकारी/कर्मचारी यांना **दिनांक १२/९/२०२४ पर्यंत** या कार्यालयास नियुक्त करुन सदर अभ्यासक्रमाची माहीती अद्ययावत करुन या कार्यालयाव्दारे अप्रुव्हड करुन घ्यावे सदर दिनांकानंतर कोणत्याही परिस्थितीत Intake Approvel केल्या जाणार नाही, याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहिती संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचूक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. याबाबत संस्थांनी https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन माहिती भरण्यात यावी.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधीत संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील.

(मनोज म अंधारे)
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.